# इंडिया सलग दुसऱ्यांदा चॅम्पियन



# संजू सॅमसन...

# क्रिकेट विश्वाचा नवा फायनल बॉस

## कोहली-सॅम्युअल्स-विल्यमसनचे रेकॉर्ड्स धुळीस




**अहमदाबाद**

भारतीय फलंदाज संजू सॅमसनने टी-२० विश्वचषक २०२६ च्या महाअंतिम सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध ८९ धावांची झंझावाती खेळी साकारून विश्वविक्रमाला गवसणी घातली आहे. या खेळीसह संजू टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात जगातील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या उभारणारा फलंदाज ठरला आहे. त्याने भारताचा दिग्गज खेळाडू विराट कोहलीचा १२ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडीत काढला आहे.

या ऐतिहासिक सामन्यात संजू सॅमसनने सुरुवातीला अवघ्या ३३ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले आणि त्यानंतर अतिशय आक्रमक फलंदाजीचे प्रदर्शन केले. संजू आपल्या शतकाच्या उंबरठ्यावर असताना ८९ धावांवर बाद झाला. मात्र, या धावांच्या जोरावर त्याने २०१४ च्या विश्वचषक फायनलमध्ये विराट कोहलीने श्रीलंकेविरुद्ध केलेल्या ७७ धावांच्या विक्रमाला मागे टाकले आहे. आता भारतासाठी विश्वचषक फायनलमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा मान संजू सॅमसनच्या नावे जमा झाला आहे. मार्लन सॅम्युअल्स आणि केन विल्यमसनलाही टाकले मागे

संजू सॅमसन केवळ भारताचाच नव्हे, तर जागतिक स्तरावर टी-२० विश्वचषक फायनलमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आहे. त्याने वेस्ट इंडिजच्या मार्लन सॅम्युअल्सचा (८५* धावा, विरुद्ध इंग्लंड) आणि न्यूझीलंडच्या केन विल्यमसनचा (८५ धावा, विरुद्ध ऑस्ट्रेलिया) विक्रम मोडीत काढला आहे.

### टी-२० विश्वचषक फायनलमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या

८९ संजू सॅमसन-न्यूझीलंड* ८५ मार्लन सॅम्युअल्स-इंग्लंड * ८५- केन विल्यमसन-ऑस्ट्रेलिया* ७८ -मार्लन सॅम्युअल्स श्रीलंका* ७७ -मिचेल मार्श-न्यूझीलंड

# दो भाई दोनो तबाही... संजूसह अभिषेकचा धमाका!



**अहमदाबाद :** साबरमतीच्या तीरावर रविवारी धावांचा असा काही पूर आला की त्यात न्यूझीलंडचे गोलंदाज वाहून गेले. टी-२० विश्वचषक २०२६ च्या रणसंग्रामात भारतीय फलंदाजांनी केवळ बॅट चालवली नाही, तर इतिहासाच्या पानावर आपल्या पराक्रमाची मोहोर उमटवली. अवघ्या ७.२ षटकांत शंभरी गाठत भारताने विश्वचषकाच्या बाद फेरीत शतकाचा नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला. मैदानावर उतरताच अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन या जोडीने न्यूझीलंडच्या गोलंदाजीचा धुरळा उडवला.

अवघ्या २४ चेंडूंत ५० धावांची भागीदारी रचत या जोडीने १९ वर्षांचा दुष्काळ संपवला. या ऐतिहासिक खेळीने पाकिस्तानचा १७ वर्षांपूर्वीचा विक्रमही मोडीत काढला. २००९ च्या फायनलमध्ये कामरान अकमल आणि शाहझैब हसन यांनी केलेली ४८ धावांची भागीदारी आता इतिहासजमा झाली असून, संजू-अभिषेकच्या नावे सर्वोच्च सलामीच्या भागीदारीची नोंद झाली आहे. विशेषतः अभिषेक शर्माने टीकेच्या झोड उठवणाऱ्यांची तोंडे आपल्या १८ चेंडूंतील वादळी अर्धशतकाने कायमची बंद केली. ज्या वेळी संघाला त्याची नितांत गरज होती, त्याच वेळी त्याने आपली 'रुद्र' कळा दाखवली.

## संक्षिप्त वृत्त

### कंदलगाव येथे जागेच्या वादातून चाकूने मारहाण

**सोलापूर :** जागेच्या वादातून चाकू आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत ६० वर्षीय इसम जखमी झाले . ही घटना कंदलगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे आज रविवारी सकाळच्या सुमारास घडली. अण्णाराह अप्पाराव वाघमारे (वय ६० रा. कंदलगाव) असे जखमीचे नाव आहे. त्यांना मंद्रूप येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात मिथुन (पुतण्या) यांनी दाखल केले. सकाळी नऊ वाजेच्या सुमारास त्यांच्या घराजवळ कैलास उडानशिवे, विठ्ठल उडाणशिवे आणि इतर तिघांनी मिळून त्यांना मारहाण केली.अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### मोहोळ येथे पिकअपच्या धडकेने महिलेचा मृत्यू

**सोलापूर :** वेगाने जाणाऱ्या पिकअपच्या धडकेने ५० वर्षीय पादचारी जाणारी महिला गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वी मरण पावली . हा अपघात मोहोळ येथील वैराग रोडवर आज रविवारी सकाळच्या सुमारास घडला. मंगल नवनाथ बनसोडे (वय ५० रा. सिद्धार्थनगर मोहोळ) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे.रविवारी सकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास त्या मोहोळ ते वैराग रोड येथील शेतातून पायी रस्ता क्रॉस करीत होत्या. त्यावेळी पिकअपच्या धडकेने त्या गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना मयूर (मुलगा) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्या उपचारापूर्वी मरण पावल्या. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### तोगराळी येथे मधमाशाच्या दंशाने दोन तरुणी जखमी

**सोलापूर :** विहीरीतून पाणी भरताना अचानक झाडावरील आग्या मोहोळच्या मधमाशा उडून दंश केल्याने दोन तरुणी जखमी झाल्या. ही घटना तोगराळी (ता. दक्षिण सोलापूर ) येथे आज रविवारी सकाळच्या सुमारास घडली. ऐश्वर्या भागवत मुंगळे (वय १५ ) आणि सुधाराणी संजय मुंगळे (वय १९ दोघी रा.तोगराळी) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी भागवत (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. आज सकाळच्या सुमारास ऐश्वर्या आणि सुधाराणी या दोघी शेतातील विहिरीजवळ पाणी भरीत होत्या. त्यावेळी अचानक झाडावरील आग्या मोहोळच्या माशा उडून दंश केल्याने त्या जखमी झाल्या.

### चिंचवली येथे कॅनलच्या पाण्यावरून तलवारीने मारहाण

**सोलापूर :** कॅनलचे पाणी घेण्याच्या कारणावरून तलवार, लोखंडी रॉड आणि लाकडाने केलेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले. ही घटना चिंचवली (ता.माढा) येथे काल शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. सचिन कल्याण मोरे (वय ४०) आणि समाधान विष्णू सुतार (वय ३२ दोघे रा.बावी ता.माढा) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना माढा येथे प्राथमिक उपचार करून पहाटेच्या सुमारास सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. शनिवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास चिंचवली येथील कॅनल जवळ पाण्याच्या कारणावरून त्या दोघांना अमोल लोंढे आणि इतर सहा जणांनी मिळून मारहाण केली होती. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे .



# रंगोत्सवात मिसेस कोठे-कोंड्याल यांचा सहभाग

**सोलापूर/प्रतिनिधी**



सोलापूर : रंगोत्सवात सहभागी झालेल्या ज्ञानेश्वरी देवकर, मोनिका कोठे, धनश्री कोंड्याल व इतर.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि दयावान बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने प्रसारमाध्यम क्षेत्रात कार्यरत महिलांसाठी विशेष रंगोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात मिसेस कोठे आणि मिसेस कोंड्याल यांच्यासह उपमहापौरांनी सहभाग नोंदवला होता.

**महिला पत्रकारांचाही समावेश**

सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या आवारात पार पडलेल्या या कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले. प्रसारमाध्यमातील महिला पत्रकारांनी एकमेकांना रंग लावत आपुलकी आणि स्नेहाचा संदेश दिला. सामाजिक ऐक्य, आनंद आणि सकारात्मकतेचा संदेश देत हा रंगोत्सव संस्मरणीय ठरला. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, मोनिका देवेंद्र कोठे, धनश्री विनायक कोंड्याल, नगरसेविका विजया नागेश खरात, धनश्री विनोद भोसले तसेच माजी नगरसेविका मंगला दिलीप कोल्हे यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिला पत्रकार, महिला प्रतिनिधी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत रंग, आनंद आणि आपुलकीने भरलेला हा रंगोत्सव सोलापुरात उत्साहात पार पडला.उत्साहपूर्ण जल्लोष साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे आणि खजिनदार किरण बनसोडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले तर उपाध्यक्ष उमेश कदम यांनी आभार मानले.

# बोरामणी येथील द्राक्ष शेतकऱ्यांना ३२ लाखांस गंडवले

**सोलापूर :** बोरामणी येथील द्राक्ष बागायतदारांना ३२ लाख २० हजारास गंडवल्याची घटना नुकतीच उघडकीस आली. याप्रकरणी सोलापूर तालुक्याच्या पोलिसांनी संग्राम धोंडीराम पाटील (रा.संग्रामनगर, अकलूज) याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

यासंदर्भात शशिकांत दर्याप्पा हलसगे (रा.बोरामणी ता.दक्षिण सोलापूर) या शेतकऱ्याने नुकतीच पोलिसात तक्रार दाखल केली. अकलूज येथील संग्राम पाटलाने त्यांच्याशी ओळख केली. आणि बोरामणी परिसरातील शेतकऱ्याकडून एकूण १ कोटी ५५ लाख रुपयाचे द्राक्ष खरेदी केले होते. एकूण रकमेतील १ कोटी २३ लाख रुपये त्याने शेतकऱ्यांना दिले होते. उर्वरित ३२ लाख २० हजार रुपयाची रक्कम वेळोवेळी मागणी करून देखील पाटलाने दिले नाही. फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर शशिकांत हलसगे या शेतकऱ्याने नुकतीच पोलिसात तक्रार दाखल केली.

# अन्नपुर्णा धनशेट्टी यांचे निधन; आज श्रध्दांजली सभा



**सोलापूर :** सोलापूरचे थोर हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी यांच्या सुनबाई व थोर स्वातंत्र्यसैनिक, शांतीसंग्राम, माजी आमदार कै. शिवशंकर मल्लप्पा धनशेट्टी यांच्या धर्मपत्नी, स्वातंत्र्य लढ्यापासून विविध आंदोलनात सहभागी झालेल्या अन्नपूर्णा शिवशंकर धनशेट्टी यांचे १०० व्या वर्षी वृध्दापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या त्यागमय जीवनाला अभिवादन करण्यासाठी सोमवार दि. ९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता मातोश्री सेवा कुंज जोडभावी पेठ येथे श्रध्दांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. हुतात्मा शिक्षण प्रसारक मंडळ, बसव ब्रिगेड, श्री. बसवेश्वर सर्कल मित्र परिवार व श्री. श्रावण मास भक्त मंडळ आदी संघटनांच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे.

# अतिक्रमण पथकाने जप्त केलेले लोखंडी साहित्य ठेकेदाराने परस्पर विकले

**अक्कलकोट येथील प्रकार**

**ठेकेदारासह ७ जणांविरुद्ध गुन्हा**

**सोलापूर/प्रतिनिधी**

येथील नगरपरिषदेच्या अतिक्रमण पथकाने राबविलेल्या माहिमेतील जप्त लोखंडी साहित्य ठेकेदाराने परस्पर विकल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे.

याप्रकरणी अक्कलकोट उत्तरच्या पोलिसांनी रत्नप्रभा फॅसिलिटी सर्विसेसच्या (एलएलपी) ठेकेदारासह सात जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे या प्रकारामुळे अक्कलकोट परिसरात खळबळ उडाली आहे . यासंबंधी नगरपरिषदेचे आरोग्य निरीक्षक नितीन सुरेश शेंडगे (रा.मोरेवस्ती अक्कलकोट) यांनी नुकतीच पोलिसात तक्रार दाखल केली.४ ते ५ मार्च या दोन दिवसात अक्कलकोट शहरातील तूप चौक, मेन रोड, लक्ष्मी मार्केट, कारंजा चौक, समाधी मठ आणि बस स्टॅन्ड परिसरात झालेले अतिक्रमण नगर परिषदेच्या वतीने काढण्यात आले होते. त्यावेळी जप्त केलेले लोखंडी पत्रे, अँगल, शटर, पत्र्याचे खोके आणि इतर लोखंडी साहित्य नगरपरिषदेच्या कचरा डेपोत जमा करण्याचे काम रत्नप्रभा फॅसिलिटीच्या ठेकेदाराला देण्यात आले होते. मात्र ते दोन ते तीन टनाचे लोखंडे साहित्य नगरपरिषदेच्या गोदामात जमा न करता ठेकेदाराने घोळसगावकर नावाच्या इसमास विकल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे पोलिसांनी रत्नप्रभा फॅसिलिटीचे ठेकेदार लोकेश राठोड(रा.नागराळी) रवी साबळे, राजू यारोळे (रा.बुधवार पेठ) ,सुजित कांबळे(सुपरवायजर), ट्रॅक्टरचा चालक दीपक यारोळे, कन्हैया वाघमारे आणि लोखंडी साहित्य घेतलेला देवा घोळसगावकर आणि इतर लोकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.पुढील तपास हवालदार कोळी करीत आहेत.

# सख्ख्या भावाची आत्महत्या; भाऊ आणि पुतण्या गायब

**सांगोला/प्रतिनिधी**

शेतात कब्जा करून सख्या वृद्ध भावाला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याच्या गुन्ह्यातील विठ्ठल रामा बंडगर (भाऊ) आणि त्याचा मुलगा सचिन बंडगर (पुतण्या दोघे रा. चिकमहुद ता.सांगोला) हे दोघे गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार झाले. त्यांच्या शोध घेण्यासाठी सांगोला पोलिसांनी दोन पथके नेमली आहेत.

ही घटना चिकमहूद (ता.सांगोला) येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली होती. अर्जुन रामा बंडगर (वय ६५ रा. चिकमहूद) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. मयत अर्जुन बंडगर यांची गट क्रमांक ११००/१क येथे शेती आहे. त्यांच्या शेतातील अर्ध्या एकर जमिनीत त्यांचा भाऊ विठ्ठल बंडगर हा गेल्या ४ वर्षापासून अतिक्रमण करून जबरदस्तीने शेती करीत होता. प्रतिष्ठित लोकांनी सांगून देखील विठ्ठल आणि त्याचा मुलगा सचिन हे दोघे ऐकत नव्हते. आणि मयत अर्जुन आणि त्यांच्या मुलांना नेहमी मारहाण आणि शिवीगाळ करीत होते.

त्यांच्या त्रासाला कंटाळून अर्जुन बंडगर यांनी शुक्रवारी सकाळच्या सुमारास आंब्याच्या झाडाला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. मृत्यूपूर्वी त्यांनी सख्खा भाऊ आणि पुतण्याच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचे त्यांनी चिठ्ठीत नमूद केले होते. त्याप्रमाणे पोलिसांनी दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक वाघे करीत आहेत.




**जखमी झालेल्या तरुणाचा मृत्यू**

सोलापूर : दुचाकीच्या अपघातात गंभीर जखमी झालेला मुगळी (ता. अक्कलकोट) येथील तरुणाच्या सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना आज रविवारी सकाळी मृत्यू झाला.

दत्ता मल्लिकार्जुन चव्हाण (वय २२ रा.मुगळी ता.अक्कलकोट) असे मयताचे नाव आहे. ३ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास बळगानुर (कर्नाटक) येथील शेतातून जात असताना दुचाकी स्लिप झाल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला विजापूर येथे प्राथमिक उपचार करून ६ मार्च रोजी देविदास चव्हाण (काका) यांनी दाखल केले होते. उपचारादरम्यान तो रविवारी मरण पावला.सिविल पोलीस चौकीत याची नोंद झाली आहे.

**शंकरनगरात आत्महत्येचा प्रयत्न**

सोलापूर : होटगी रोडवरील शंकरनगरात राहणाऱ्या सिद्धाराम मल्लेशा वग्गे (वय ४८) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. काल शनिवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास त्याने घरगुती भांडणातून छताच्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून घरातील लोकांनी खाजगी रुग्णालयात उपचार करून शासकिय रुग्णालयात दाखल केले .या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.